माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.१४३०/२२/त.क्र.०८/२६/०१

श्रीमती संगीता सावळकर / श्री. अशोक सावळकर
प्लॉट क्र. ३०४, रेवा को.ऑ.हौ.सो.लि. दत्तानी पार्क,
इमारत क्र.०८, ठाकुर व्हिलेज, कांदिवली (पूर्व),मुंबई -४००१०१.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इवका) आर/दक्षिण विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग
यांचे कार्यालय,स.व प.तरण तलावाजवळ,महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२,
कांदिवली (प), मुंबई ४०००६७.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता आर/दक्षिण विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग
यांचे कार्यालय,स.व प.तरण तलावाजवळ,महात्मा गांधी छेद
रस्ता क्र.२, कांदिवली (प), मुंबई ४०००६७.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०१.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्रीमती संगीता सावळकर व श्री.अशोक सावळकर यांच्या अपील क्रमांक २२०५७०/२२/०१, २२०५७१/२२/०१ यामध्ये दिनांक ०५/०७/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशात तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता आर/दक्षिण श्री.रोहित त्रिवेदी यांना असे आदेश दिले आहेत की, अपिलार्थींना एस.टी.सी. कन्सल्टंट अँड स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट बाबतची माहिती सात दिवसात कळविण्यात यावी तसेच दिनांक ३०/१२/२०१९ रोजी डीएमसी झोन सात यांना पाठवण्यात आलेल्या पत्रावर कुठली कारवाई करण्यात आली आहे याबाबतची माहिती संपूर्ण कागदपत्रांसह पंधरा दिवसात कळवण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी दोन्ही प्रकरणात जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. अपिलीय अधिकारी मात्र यात हजर असताना व वरील आदेश हे स्पष्टपणे प्रथम अपिलिय अधिकारी यांना निर्देशित असून त्याचे अनुपालन

करण्यासंदर्भात अनुक्रमे ७ व १५ दिवस इतकी मुदत दिली असताना तब्बल साडेतीन वर्षानंतरही त्याची अंमलबजावणी न होणे ही बाब अत्यंत दुर्दैवी असून प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे.

तरी, प्रथमदर्शनी आपल्या कर्तव्यात कसूर केली असल्याचे स्पष्टपणे आढळून येते व त्यावर **कलम १९ (८) (ग) व २० (१)** अन्वये झालेल्या विलंबाबाबत **रुपये २५,०००/- इतकी शास्ती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर लादण्यात येत असून** सदरची शास्ती त्यांच्या मासिक वेतनातून **पाच समान** हप्त्यात वसूल करण्यात यावी व शासन परिपत्रक सा.प्र.वि. दिनांक ०९.०५.२००७ व शासन सा.प्र.वि. शुध्दिपत्रक दिनांक २८.०५.२००७ मध्ये नमूद केलेल्या पुढील लेखाशीर्षाखाली जमा करावी.

०७०-इतर प्रशासनिक सेवा

६० इतर सेवा, ८०० इतर जमा रकमा

(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१).

**शास्तीचा भरणा विहित मुदतीत करून आयोगाला अनुपालन अहवाल पाठवावा.**

**प्रस्तुत प्रकरणी तत्कालिन अपीलिय अधिकारी हे ही सुनावणीस हजर असून दिलेले आदेश व त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी म्हणून त्यांची देखील असताना याबाबतीत त्यांच्याकडून झालेली दिरंगाई व विलंब हा पूर्णतः असमर्थनीय असून उपरोक्त आदेशाचे तात्काळ अनुपालन करण्याच्या निर्देशासह झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा सादर केल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी कलम १९ (८) (ख) अन्वये तक्रारदार यांना झालेल्या मानसिक त्रासाबद्दल तसेच अन्य हानीबद्दल भरपाई देण्याबाबत स्वतंत्र आदेश पारित करण्यात येतील.**

**आदेश**

**वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission ★ Maharashtra ★

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०६.०१.२०२६**

jyotsna

माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.१४३९/२२/त.क्र.०९/२६/०१**

श्रीमती संगीता सावळकर / श्री. अशोक सावळकर
प्लॉट क्र. ३०४, रेवा को.ऑ.हौ.सो.लि. दत्तानी पार्क,
इमारत क्र.०८, ठाकुर व्हिलेज, कांदिवली (पूर्व),मुंबई -४००१०१.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इवका) आर/दक्षिण विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग
यांचे कार्यालय,स.व प.तरण तलावाजवळ,महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२,
कांदिवली (प), मुंबई ४०००६७.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता आर/दक्षिण विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग
यांचे कार्यालय,स.व प.तरण तलावाजवळ,महात्मा गांधी छेद
रस्ता क्र.२, कांदिवली (प), मुंबई ४०००६७.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०१.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्रीमती संगीता सावळकर व श्री.अशोक सावळकर यांच्या अपील क्रमांक २२०५७०/२२/०१, २२०५७१/२२/०१ यामध्ये दिनांक ०५/०७/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशात तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता आर/दक्षिण श्री.रोहित त्रिवेदी यांना असे आदेश दिले आहेत की, अपिलार्थींना एस.टी.सी. कन्सल्टंट अँड स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट बाबतची माहिती सात दिवसात कळविण्यात यावी तसेच दिनांक ३०/१२/२०१९ रोजी डीएमसी झोन सात यांना पाठवण्यात आलेल्या पत्रावर कुठली कारवाई करण्यात आली आहे याबाबतची माहिती संपूर्ण कागदपत्रांसह पंधरा दिवसात कळवण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी दोन्ही प्रकरणात जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. अपिलीय अधिकारी मात्र यात हजर असताना व वरील आदेश हे स्पष्टपणे प्रथम अपिलिय अधिकारी यांना निर्देशित असून त्याचे अनुपालन

jyotsna

करण्यासंदर्भात अनुक्रमे ७ व १५ दिवस इतकी मुदत दिली असताना तब्बल साडेतीन वर्षानंतरही त्याची अंमलबजावणी न होणे ही बाब अत्यंत दुर्दैवी असून प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे.

तरी, प्रथमदर्शनी आपल्या कर्तव्यात कसूर केली असल्याचे स्पष्टपणे आढळून येते व त्यावर **कलम १९ (८) (ग) व २० (१)** अन्वये झालेल्या विलंबाबाबत **रुपये २५,०००/- इतकी शास्ती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर लादण्यात येत असून** सदरची शास्ती त्यांच्या मासिक वेतनातून **पाच समान** हप्त्यात वसूल करण्यात यावी व शासन परिपत्रक सा.प्र.वि. दिनांक ०९.०५.२००७ व शासन सा.प्र.वि. शुध्दिपत्रक दिनांक २८.०५.२००७ मध्ये नमूद केलेल्या पुढील लेखाशीर्षाखाली जमा करावी.

०७०-इतर प्रशासनिक सेवा

६० इतर सेवा, ८०० इतर जमा रकमा

(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१).

**शास्तीचा भरणा विहित मुदतीत करून आयोगाला अनुपालन अहवाल पाठवावा.**

**प्रस्तुत प्रकरणी तत्कालिन अपीलिय अधिकारी हे ही सुनावणीस हजर असून दिलेले आदेश व त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी म्हणून त्यांची देखील असताना याबाबतीत त्यांच्याकडून झालेली दिरंगाई व विलंब हा पूर्णतः असमर्थनीय असून उपरोक्त आदेशाचे तात्काळ अनुपालन करण्याच्या निर्देशासह झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा सादर केल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी कलम १९ (८) (ख) अन्वये तक्रारदार यांना झालेल्या मानसिक त्रासाबद्दल तसेच अन्य हानीबद्दल भरपाई देण्याबाबत स्वतंत्र आदेश पारित करण्यात येतील.**

**आदेश**

**वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०६.०१.२०२६**

State Information Commission * Maharashtra *

jyotsna